बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०९ जुलै २०२४**

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५४३/२०२४ भा न्या सं ३०३(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०६/०७/२०२४ रोजी १९.०० वा ते २०.०० वा चे दरम्यान, सिव्हील हॉस्पीटल येथील बी ब्लॉक चे बाजुस, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/०७/२०२४ रोजी १४.५६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संतोष सुर्यकांत बिराजदार, वय- ४० वर्षे, रा. घर नं. ३४, भुषण नगर, रामवाडी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २५,०००/- रु एक काळे रंगाची सिल्व्हर पट्टा असलेली हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या ताब्यातील मोटार सायकल क्र एम एच १३ बी डी ३५९२ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन लावलेली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल ही फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे. म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १५३५ फुटाणे |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५४२/२०२४ भादवि ४९८(अ),३२३,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २६/१०/२०२१ रोजी ते दि. २४/०५/२०२२ रोजी चे दरम्यान, मु.पो. मिडशिंगी, ता. सांगोला, जि. सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/०७/२०२४ रोजी १४.१२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुप्रिया प्रशांत खडतरे, वय- २३ वर्षे, रा. हल्ली- ब्लॉक नं. ०९, मोची हौसिंग सोसायटी, नरसिंह नगर, मोदी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रशांत भिमराव खडतरे- पती, २) सोनाबाई भिमराव खडतरे- सासु, ३) मनिषा दत्तात्रय गवळी- नणंद, ४) दत्तात्रय गवळी- नणंदेचा पती, सर्व रा. मु.पो. मिडशिंगी, ता. सांगोला, जि. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे लग्न झ ााल्यापासुन दुसऱ्या महिन्यानंतर दि. २६/१०/२०२१ रोजी ते दि. २४/०५/२०२२ रोजी चे दरम्यान, यातील वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस लग्नात मानपान झ्ज्ञाला नाही, आई वडीलांकडुन चारचाकी घेण्यासाठी दोन लाख रुपये घेवून ये म्हणून, तसेच घरातील कामे व्यवस्थित येत नाहीत म्हणून, तु शेतात कामाला जा असे म्हणून फिर्यादीस शारिरीक, मानसिक छळ करुन मारहाण करुन माहेरी हाकलुन दिले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ४२१ ईनामदार- ८६०५०१०१४१ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३८८/२०२४ भा न्या सं १०६(१) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०६/०७/२०२४ रोजी रात्री १२.१८ वा चे सुमारास, डी मार्ट शेजारील सर्व्हीस रोडवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/०७/२०२४ रोजी १४.०४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विश्वनाथ मल्लाप्पा मंदकल, वय- ५३ वर्षे, रा. १०/१३, घोंगडेवस्ती, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) राष्ट्रीय सुरक्षा मार्गाचे मुख्य सुरक्षा अधिकारी, २) सदरचे काम करणारे ठेकेदार व मक्तेदार तसेच संबंधित इतर अधिकारी |
| **मयताचे नाव** | : | मल्लिकार्जुन विश्वनाथ मंदकल, वय- २७ वर्षे, रा. १०/१३, घोंगडेवस्ती, भवानी पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि. ०५/०७/२०२४ रोजी २२.०० वा चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा मल्लिकार्जुन हा त्याचा मित्र शिवम कारंडे याचा वाढदिवस असल्याने वाढदिवस साजरा करण्यासाठी मोटार सायकल क्रं. एम एच १२ टी एक्स १४३६ वरुन सदर ठिकाणी जात असताना रोडवर डांबर मिक्स खडीच्या ढिगाऱ्यास धडकुन मोटार सायकलचा अपघात झाला. फिर्यादीच्या मुलाच्या अपघात झालेल्या ठिकाणी डांबर मिक्स खडी सर्व्हीसरोडच्या कामासाठी आणलेले डांबर मिक्स खडी ही ढिगारा करुन त्या ढिगाऱ्याच्या आजुबाजुला लोकांना व वाहन चालकांना डांबर मिक्स खडीच्या ढिगारे रस्त्यावर टाकले आहेत. याबाबत सावधानतेचा बोर्ड किंवा सदर ठिकाणी काम चालु असलेबाबत कोणतेही साधन लावण्याचे व ठेवल्याचे दिसुन आले नाही. तसेच तेथे कोणतेही बॅरेगेट किंवा कोणतेही दिशा दर्शक बोर्ड लावलेले दिसले नाहीत म्हणून यातील फिर्यादीची वरील आरोपीत यांचे निष्काळजीपणा व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन कोणत्याही उपाययोजना केले नाही म्हणून. फिर्यादीची वरील संबंधित लोकांविरुध्द तक्रार आहे म्हणून. तपासः- पोसई- येडे- **९७६३७२७५२२** |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४३५/२०२४ भा न्या सं ३०८(३),३०९,३५१(२),३२४(४), आर्म ॲक्ट ४,२५,१३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०८/०७/२०२४ रोजी दुपारी १२.१५ वा चे सुमारास, विठ्ठल लॉजच्या बाजुला, निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर येथील रत्न परमिट रुम ॲन्ड बार मध्ये |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/०७/२०२४ रोजी १६.३१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | केदार प्रभु पुजारी, वय- ३९ वर्षे, रा. घर नं. १३१४, उत्तर कसबा, टिळक चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | नागेश शिवाजी महानुर, रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत याने हातात लोखंडी कोयता घेवून येवून तुम्हाला धंदा करायचा असेल तर मला महिन्याला १०,०००/- रु दयावे लागेल, नाहीतर तुमचा धंदा चालु देणार नाही, असे म्हणून स्वतःचे हाताने दारु घेवून पिवुन टेबलवरील काचेचे ग्लास व काऊंटरवर ठेवलेले रॉयल स्टॅग, डिएसपी प्लेन, मॅकडॉल नंबर १, व इतर दारुच्या बाटल्या जमिनीवर फेकुन फोडुन तुम्ही पैसे देत नाही काय, तुम्हाला आज दाखवतो, असे म्हणून काऊंटर मधील २,४००/- रु जबरदस्तीने काढुन घेतले आहेत. आरोपीताचे दहशतीला घाबरुन फिर्यादीच्या दुकानाचे आजुबाजुच्या व्यापाऱ्यांनी पळापळ करुन त्यांचे दुकान बंद करुन पळुन गेले आहेत म्हणून फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द फिर्याद आहे. तपासः- सपोनि- धायगुडे- **८८८८८०८९०८** |